सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.०२०-२५६२१३४६
website : www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune - 411007.
Phone No. : 020-25621398
E-mail : bee@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एस ॲण्ड टी/ 441 दिनांक : 15/03/2025

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील उन्हाळी २०२५ सत्र परीक्षा अर्ज भरण्यास ०२ (दोन) दिवसांची अंतिम मुदतवाढ...**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील उन्हाळी २०२५ सत्रात येणाऱ्या नियमित अथवा पुनर्परीक्षार्थी एकत्रित परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ पासून टप्प्याटप्प्याने सुरु करण्यात आली आहे. सर्व अभ्यासक्रमांचे विहित शुल्क, विलंबशुल्कासहची परीक्षा अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर उर्वरित सर्व पात्र परीक्षार्थांसाठी **दिनांक २० व २१ मार्च, २०२५ अशी ०२ (दोन) दिवसांची अंतिम मुदतवाढ** प्राचार्य, प्राध्यापक, परीक्षा अधिकारी, विद्यार्थी, पालक, अधिकार मंडळाचे सदस्य तसेच सर्व विद्यार्थी संघटना यांच्या विनंतीवरुन विद्यार्थी हितास्तव करण्यात येत आहे. यानंतर कोणत्याही परिस्थितीत ही मुदतवाढ होणार नाही. कारण अशी मुदतवाढ झाल्यास परीक्षार्थी ओळखपत्र, बारकोड जुळणी आणि परीक्षार्थींच्या अभ्यास विषयांच्या निश्चिती करताना समस्या निर्माण होतात. परिणामी विद्यार्थी, पालक, प्राचार्य, परीक्षा अधिकारी यांनाच स्थानिक पातळीवर रोषास पात्र व्हावे लागते आणि विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या परीक्षा आयोजनावरही विपरित परिणाम होतो.

सबब, या पत्राद्वारे सर्व महाविद्यालये/परिसंस्था, प्राचार्य/संचालक, प्राध्यापक, विभागप्रमुख, परीक्षा अधिकारी, परीक्षा सहायक कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना आवाहन करण्यात येते की, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ ते दिनांक १९ मार्च, २०२५ या कालावधीत परीक्षा अर्ज भरण्यापासून वंचित असलेल्या, परंतु पात्र असलेल्या परीक्षार्थींशी संपर्क करावा. त्यांचा एक WhatsApp गट तयार करावा किंवा आपल्या स्तरावरील योग्य ती पध्दती अवलंबावी. विषयशिक्षक, परीक्षा अधिकारी यांनी या गटात/प्रक्रियेत सक्रीय होऊन विद्यार्थ्यांना दिनांक २० व २१ मार्च, २०२५ या

...२/-

दोन दिवसांच्या विशेषबाब कालावधीची स्पष्ट कल्पना द्यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये, याची दक्षता घेऊन पात्र परीक्षार्थी १०० टक्के परीक्षा अर्ज भरतील याची खात्री करावी. उर्वरित सर्व पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरुन घ्यावेत. हे अर्ज Online भरुन घेतानाच प्रक्रियेनंतर ते विद्यापीठाच्या अंतर्गत व संरक्षित प्रणालीद्वारे परीक्षा अधिकारी यांनी तक्यातील सूचनेप्रमाणे तात्काळ Inward करावेत. परीक्षा अर्ज भरण्याच्या कोणत्याही कालावधीत (ज्यांची नियमित परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे अशांसाठीही) हे अर्ज Inward करणे अपेक्षित आहे, म्हणजे मुदत संपल्यानंतर परीक्षा अर्ज Inward करण्यात घाई होणार नाही, याचीही काळजी संबंधितांनी घ्यावी.

| **परीक्षा अर्ज भरण्याकरिता मूदतवाढीचा कालावधी** | **मुदतवाढ कालावधीतील परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा कालावधी** |
|---|---|
| दिनांक २० मार्च, २०२५<br>ते<br>दिनांक २१ मार्च, २०२५ | दिनांक २० मार्च, २०२५<br>ते<br>दिनांक २२ मार्च, २०२५ |

हे पत्रक सर्वच संबंधित घटकांच्या निदर्शनास तात्काळ आणावे.

कळावे,

आपला,

(डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Mgnt-D:\AR & DR Letter\DR and AR File.docx